ePaper

## देवगड येथे सहलीसाठी गेलेले पिंपरी-चिंचवड मधील 5 विद्यार्थी बुडाले!



| वर्ष - 7 | अंक - 212 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- महाराष्ट्राचे खेळाडू सर्वोत्तम यशासाठी सज्ज!
- हिनाची परदेशातही हवा!
- आठवड्यातून फक्त 5 दिवस बँका!
- गोपीचंद पडळकरांवर चप्पलफेक!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 10 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरीला जमते अन् पुण्यात फसते!

## पिंपरीत 50 टक्के किलोमीटरवर धावते 'बीआरटी'; पुण्यात केवळ नावापुरती

**| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**देशात सर्वप्रथम पुण्यात सुरू झालेल्या जलद बस वाहतुकीच्या योजनेला (बीआरटी) पुण्यात घरघर लागली असतानाच शेजारच्या पिंपरी-चिंचवडमध्ये ही योजना सध्या ५० किलोमीटरहून अधिक मार्गावर 'धावत' आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका 'बीआरटी' सक्षमतेने राबवू शकते, तर पुणे महापालिकेला ही व्यवस्था राबविण्यात अडचणी काय येत आहेत, हे प्रशासक तथा आयुक्त पुणेकरांना जाहीरपणे सांगू शकतील का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**



'पुणे महानगर परिवहन महामंडळा'ने (पीएमपी) बसच्या जलद वाहतुकीसाठी शहरात सन २००७ मध्ये हडपसर-स्वारगेट-कात्रज या मार्गावर पथदर्शी 'बीआरटी' सुरू केली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने 'बीआरटी' मार्ग वाढविण्यात आले. पुण्यात संगमवाडी ते विश्रांतवाडी, येरवडा ते वाघोली (आपल घर) या मार्गावर 'बीआरटी' सुरू झाली. पुण्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत 'बीआरटी' राबविण्यास सुरुवात झाली. पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरुवातीपासूनच 'बीआरटी'च्या अंमलबजावणीकडे व्यवस्थित लक्ष दिले.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात सध्या एकूण आठ 'बीआरटी' मार्ग असून, हे अंतर ६९.५ किलोमीटर आहे. 'बीआरटी' मार्गांतून दररोज साधारणत: ८०० बस धावतात. याद्वारे साधारण सहा लाख प्रवासी प्रवास करतात. एकूण 'बीआरटी' मार्गांपैकी पाच मार्ग पिंपरीत असून, तीन मार्ग पुण्यात आहेत. पिंपरीत एकूण ५० किलोमीटरची 'बीआरटी' सुरू आहे. पुण्यात केवळ १७ किलोमीटरवर 'बीआरटी' धावत आहे. त्यातही फक्त एकाच मार्गावर पूर्ण क्षमतेने ही सेवा सुरू आहे. पिंपरी पालिकेकडून 'बीआरटी' वाढविण्यासाठी ती सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे त्यांच्या हद्दीत 'बीआरटी'चे मार्ग वाढत आहेत. दुसरीकडे पुणे महापालिका 'बीआरटी'वर लक्ष देण्याऐवजी ती हटविण्याच्या मागे लागली आहे. त्याचा फटका प्रवाशांबरोबरच 'पीएमपी'लाही बसत आहे.

### एका दिवसाची 'बीआरटी'ची स्थिती

| मार्ग अंतर (किमी) | बसच्या फेऱ्या | प्रवासी उत्पन्न (~) |
|---|---|---|
| नाशिक फाटा ते वाकड | आठ | १४८ १३,८०२ १,९८,३३१ |
| निगडी ते दापोडी | बारा | २१०९ १,२५,५१० २,३७,९५८ |
| संगमवाडी ते विश्रांतवाडी | नऊ | ५६४ ३२,००१ ४,८३,५६४ |
| सांगवी फाटा ते किवळे | १४.५ | १११० ७८,२६४ १३,०५,०२५ |
| येरवडा ते आपले घर | सात | १९९० १,०८,१३८ १८,४७,८४६ |
| काळेवाडीफाटा ते चिखली | १०.५ | ३९८ २६,०८५ ३,४८,७८७ |
| स्वारगेट ते कात्रज | सहा | २,०८१ १,३०,७८६ १६,७३,५८१ |
| दिघी ते आळंदी | ५.५ | १,१९५ ७९,०९४ १३,१६,७३६ |
| | एकूण | ६९.५ ९,५९५ ५,९३,६८० ९२,११,८२९ |



## रेल्वेचा आज मेगाब्लॉक! पुणे ते लोणावळा मेगाब्लॉकमुळे काही लोकल रद्द!

**| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**मध्य रेल्वेच्या पुणे विभागात पुणे ते लोणावळा स्थानकांदरम्यान उद्या (ता.१०) मेगाब्लॉक घेण्यात येणार आहेत. त्यामुळे अनेक लोकल गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुणे-लोणावळा उपनगरी मार्गावर अभियांत्रिकी आणि दुरुस्तीच्या तांत्रिक कामांसाठी हा मेगाब्लॉक घेण्यात आला आहे.**

मेगाब्लॉकमुळे पुण्याहून लोणावळ्याला जाणाऱ्या काही लोकल गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यात पुण्याहून लोणावळ्यासाठी सकाळी ९.५७, सकाळी ११.१७, दुपारी ३ वाजता, सायंकाळी ४.२५, सायंकाळी ८.०२ वाजता सुटणाऱ्या गाड्या रद्द राहतील. याचबरोबर शिवाजीनगरहून तळेगावला दुपारी ३.४७ वाजता सुटणारी लोकल आणि शिवाजीनगरहून लोणावळ्याला सायंकाळी ५.२० वाजता सुटणारी लोकल या गाड्या रद्द असतील.



तसेच, लोणावळ्यातून पुण्याला दुपारी २.५०, रात्री ७ वाजता सुटणाऱ्या लोकल रद्द करण्यात आल्या आहेत. लोणावळ्यातून शिवाजीनगरला सकाळी १०.०५, सायंकाळी ५.३० आणि रात्री ७.३५ वाजता सुटणाऱ्या लोकल रद्द करण्यात आल्या आहेत. तळेगावहून पुण्याला सायंकाळी ४.४० वाजता सुटणारी लोकलही रद्द असेल.

याचबरोबर एमजीआर चेन्नई – लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस ही गाडी सुमारे साडेतीन तास विलंबाने धावणार आहे.

# आजचे मोदी हे बाळासाहेब ठाकरेंची कृपा!

## राज्यात सध्या एक फूल दोन डाऊट फूल : संजय राऊत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आजचे मोदी (NARENDRA MODI) हे बाळासाहेब ठाकरेंची कृपा असल्याचं वक्तव्य ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केलं आहे. पुण्यात ठाकरे गटाकडून मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. दरम्यान या मेळाव्यात ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊतांनी हजेरी लावली होती.**

पुण्यातील आंबेडकर महाविद्यालयाच्या मैदानावर ठाकरे गटाकडून जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या मेळाव्याला ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे (Sushma Andhare) यांनी देखील हजेरी लावली होती. गुजरातमधील दंगलीनंतर अटलबिहारी वाजपेयी मोदींना मुख्यमंत्री पदावरुन काढायचं म्हणत होते. राजधर्माची आठवण करुन द्यायला अटलजी विसरले नव्हते. पण जेव्हा अडवाणी बाळासाहेब ठाकरेंना विचारायला आले होते तेव्हा बाळासाहेब ठाकरेंनी सांगितलं होतं, नरेंद्र मोदी गया तो गुजरात गया. तुम्ही नरेंद्र मोदींना काढू नका. जेव्हा अख्ख जग टीका करत होतं, तेव्हा बाळासाहेबांनी हे सांगितलं होतं. पण आता देश म्हणतोय की, नरेंद्र मोदी वापस आया तो पुरा देश गया. त्यामुळे मोदी जर पुन्हा आले तर लोकशाही, स्वातंत्र्य सर्व काही जाईल, असं म्हणत राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ही शिवसेना हा उसळता सागर आहे. पुण्याच्या मैदाना ही शिवसेना कशी उतरते बघा, असं म्हणत राऊतांनी फडणवीसांना देखील थेट इशारा दिलाय. आम्हाला शिल्लक सेना म्हणता. 2024 नंतर तुम्हीच शिल्लक राहणार का हा विचार करा. या महाराष्ट्रात ज्याला शिल्लेक सेना म्हणती तीच सेना आम्ही पुन्हा सत्तेवर आणून दाखवू, असं संजय राऊतांनी



म्हटलं. या देशाचा काळ पैसा जो बाहेर गेला त्याच काय झालं, असा सवाल राऊतांनी यावेळी उपस्थित केलाय. 15 लाखाचा काय झालं,भ्रष्टाचारांना फासावर लटकावू उद्याचं काय झालं, अजित पवार हसन मुश्रीफ यांचं काय झालं, प्रफुल पटेल भावना गळी राहुल शेवाळे यांचे काय झालं. ईडी त्यांना अटक करायला गेली होती, त्याचं काय झालं, हे प्रश्न देखील राऊतांनी या निमित्ताने उपस्थित केले आहेत. देशातला दहशतवाद पूर्णापणे संपवू असं सांगितलं होतं मणिपूर मध्ये काय सुरू आहे. आम्हाला डोळे वटारुन दाखवता चीनला डोळे वटारा, असं संजय राऊतांनी म्हटलं. आजही हजारो काश्मीर पंडित निर्वासितांचे जीवन जगतात, काश्मिरी पंडितांच काय झालं ते सांगा. अनेक काश्मिरी पंडित बाळसाहेब ठाकरे यांना मानतात.

कारण बाळासाहेबांनी कश्मीरी पंडितासाठी काम केलं याला म्हणतात हिंदुहृदयसम्राट. समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार होतात कुठे आहे पुतळा. हे एक नंबरचं खोटं सरकार देशात आहे, असं राऊतांनी म्हटलं. डरपोक लोकांनी शिवसेना घाबरून शिवसेनेला फोडलं. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी काय केलं मराठी माणसाच शौर्य संपवण्याच काम केलं. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले हे त्यांच्या मनात आहे, असं राऊतांनी म्हटलं. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरे यांचीच.ही शिवसेना कुण्या आयऱ्या गौऱ्याची नाही. आशा एकनाथ शिंदेंना देता आणि तुम्ही सांगता का ही शिवसेना तुमची? शरद पवार साहेब हयात आहेत, निवडणूक आयोगासमोर जाऊन बसतात तरी निवडणूक आयोगाला प्रश्न पडला की राष्ट्रवादी कोणाची. उद्धव ठाकरे असताना निवडणूक आयोगाला प्रश्न पडतो की शिवसेना कुणाची, राज्यात सध्या काय सुरू आहे एक मुख्यमंत्री दोन मुख्यमंत्री, एक फुल दोन डाऊट फुल, असं म्हणत राऊतांनी सरकारवर निशाणा साधला. मला जेलमध्ये नेले तेव्हा माझ्यावर देखील दबाव आणला गेला..पण मी शिवसेना सोडणार नाही. शिवसेनेची बेईमानी करण्यापेक्षा मरण पत्कारीन. मी घाबरून पळून जाणार नाही. 40 डरपोक पळून गेले पण लाखो मर्दानी सैनिक आमच्या सोबत, हा महाराष्ट्र झुकणार नाही. असे शिंदे मिंदे किती आले आणि गेले. या देशात अनेक सेना आल्या पण शिवसेना आजही तशीच आहे, असं संजय राऊतांनी म्हटलं. आम्हाला शिल्लक सेना म्हणता. 2024 नंतर तुम्हीच शिल्लक राहणार का हा विचार करा. या महाराष्ट्रात ज्याला शिल्लेक सेना म्हणती तीच सेना आम्ही पुन्हा सत्तेवर आणून दाखवू, असं संजय राऊतांनी म्हटलं.

### एक नंबरचं खोटं सरकार

» आजही हजारो काश्मीर पंडित निर्वासितांचे जीवन जगतात, काश्मिरी पंडितांच काय झालं ते सांगा. अनेक काश्मिरी पंडित बाळसाहेब ठाकरे यांना मानतात. कारण बाळासाहेबांनी कश्मीरी पंडितासाठी काम केलं याला म्हणतात हिंदुहृदयसम्राट. समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणार होतात कुठे आहे पुतळा. हे एक नंबरचं खोटं सरकार देशात आहे, असं राऊतांनी म्हटलं. डरपोक लोकांनी शिवसेना घाबरून शिवसेनेला फोडलं. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी काय केलं मराठी माणसाच शौर्य संपवण्याच काम केलं. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले हे त्यांच्या मनात आहे, असं राऊतांनी म्हटलं.

# नवी सांगवीत आयुक्तांचा पाहणी दौरा

## » रस्त्यांच्या कामाला यश ; शंकर जगताप व विजय ढोरे यांचा पाठपुरावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सांगवी मधील मधुबन सोसायटी येथे आयुक्तांनी पाहणी दौरा आज ता.७ रोजी केला. आयुक्त शेखर सिंह यांनी सांगवी मधील सर्व विकास कामांची पाहणी केली. मधुबन मधील १ ते ७ क्रमांक रस्त्याला शंकर जगताप व विजय बापू ढोरे यांच्या अथक प्रयत्नांमुळे यश मिळाले.**



पाहणी दौऱ्यावेळी पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी महापौर उषा मनोहर ढोरे, नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, शारदा सोनवणे, माजी सिनेट सदस्य संतोष ढोरे, जवाहर ढोरे, भाजपचे हिरेन सोनवणे, वामन झांबरे, अरविंद ढोरे, देहू अमिनेशन डेपो पतसंस्थेचे संचालक विजय बापू ढोरे उपस्थित होते.

प्रलंबित कामांचे त्वरित आदेश स्थापत्य व नगर रचना विभाग यांना आयुक्तांनी दिल्याचे विजय ढोरे यांनी सांगितले. » सांगवी येथील संगमनगर, ममतानगरमार्गे बोपोडी, औंधकडे जाणाऱ्या पुलाच्या संदर्भात चर्चा झाली. या पुलाच्या बाबतीत कृषी विभागाच्या काही तांत्रिक अडचणी असून, त्या लवकरच मार्गी लावण्यात येतील. तसेच, मधुबन सोसायटी गल्ली नंबर 1 ते १० येथील 12 मीटरचा रस्ता, नवी सांगवी येथील कृष्णा चौक येथे 20 मीटरच्या रस्त्यासंदर्भात तसेच रामनगर–यमुना सोसायटी, मयूर नगरीच्या शेजारचा रस्त्याच्या कामाला गती देण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

# आळंदीत कार्तिकी यात्रेसाठी लाखोंची गर्दी

। पुणे ।महाईन्यूज ।

**कार्तिकी यात्रा आणि संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. कार्तिकी एकादशीनिमित्त वारकऱ्यांनी आज माऊलींच्या समाधीचे दर्शन घेऊन शेतकऱ्याला सुगीचे दिवस यावेत, सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, सरकारला सद्बुद्धी द्यावी असे साकडे घातले.**



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा संजीवन समाधी सोहळा आणि कार्तिकी यात्रेनिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक ज्ञानोबा माऊली तुकारामाच्या जयघोषात दाखल झाले आहेत. पवित्र इंद्रायणीत स्नान करून माऊलींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी वारकरी दर्शनरांगेत लागले आहेत. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील भाविक मोठ्या प्रमाणावर आले आहेत. यावेळी माऊलींच्या समाधीचं दर्शन घेऊन आलेल्या वारकऱ्यांनी भावना व्यक्त करत ह्या सरकारला सद्बुद्धी द्यावी, त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घ्यावेत, शेतकऱ्यांना सुगीचे दिवस यावेत असे साकडे घातल्याचे म्हटले आहे.नुकतंच, आस्मानी संकटाने शेतकरी संकटात सापडला. अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली होती.

# रुग्णवाहिका ठरली देवदूत!

## तळवडे आग दुर्घटना : 8 आपत्तीग्रस्तांना मिळाले जीवदान; वायसीएमचे रुग्णवाहिका चालकाची कर्तव्य तत्परता

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दुपारची वेळ...सर्वत्र शांतता असताना अचानक काळजाचा ठोका चुकवणारा स्फोट झाला अन एकच पळापळ झाली. तळवडेतील कँडल कंपनीत आगीची घटना घडल्याचे समोर आले. या मध्ये सहा कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. उर्वरित अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू झाले. वायसीएमची रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. चालक मारुती जाधव यांच्या कर्तव्य तत्परतेमुळे आठ कामगारांचा जीव वाचला. त्या कामगारांसाठी रुग्णवाहिका देवदूत ठरली अशा प्रतिक्रिया नातेवाईकांमध्ये उमटल्या.**



पिंपरी चिंचवड मधील तळवडे येथील कॅण्डल कंपनीत शुक्रवारी (दि. ८) भीषण आगीची घटना घडली. या आगीत सहा कामगारांचा होरपळून मृत्यू झाला. कंपनीत धुराचे लोट पसरले होते. तसेच बाहेर पडण्यासाठी एकच रस्ता असल्याने कामगार अडकून पडले होते. मृत रुग्णांच्या नातेवाइकांनी एकच टाहो फोडला होता. स्फोट झाल्यानंतर ही माहिती सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका अग्निशमन विभाग, आपत्कालीन विभागाने दुर्घटनाग्रस्त कामगारांना वाचवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. उर्वरित कामगारांचा जीव वाचविण्यासाठी महापालिकेच्या रुग्णवाहिकेला पाचारण करण्यात आले. चालक मारुती जाधव यांनी कार्य तत्परता दाखवली. रुग्णवाहिका वेळेत घटनास्थळी पोहोचली. त्यामुळे कंपनीत संकटात अडकलेल्या आठ कामगारांना वेळेत उपचार मिळाले. उपचार मिळाल्याने कामगारांचे प्राण वाचले. या कामगिरीबद्दल बचाव कार्यात योगदान देणाऱ्या सर्व अग्निशामन दलातील जवान, रुग्णवाहिका वाहन चालक, वार्ड बॉय, डॉक्टर्स, सिस्टर यांचे कामगार कुटुंबीयांनी आभार

### सक्षम यंत्रणा हव्यात

» कंपनीत आग लागण्याच्या या पूर्वीही घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे अनधिकृत कंपन्यांची यादी काढून त्यांच्यावर रीतसर कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र या कडे दुर्लक्ष केले जात आहे. परिणामी एखादी घटना घडल्यानंतर शासकीय यंत्रणेला त्या कंपनी बाबत माहिती होत आहे. तोपर्यंत खबरदारी घेणे कठीण होत आहे. घटना घडण्याआधीच माहिती मिळाल्यास वायसीएमच्या रुग्णवाहिकेप्रमाने कामगारांचे जीव वाचवता येतील.

## देवगड येथे सहलीसाठी गेलेले पिंपरी-चिंचवड मधील ५ विद्यार्थी बुडाले

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

कोकणातील देवगड येथे पिंपरी चिंचवड मधील फिरायला गेलेले ५ विद्यार्थी बुडाले असून यामध्ये चौघांचा मृत्यू झाला आहे. तर एकाचा शोध सुरू आहे. हि घटना आज (दि.०९) सांयकाळी घडली. निगडी येथील संकल्प सैनिकी स्कूल अकॅडमीची सहल देवगड येथे गेली होती. ज्यामध्ये ३५ जणांचा समावेश होता. बुडालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ४ मुलींचा समावेश आहे. मृतांमध्ये अंकिता गालटे, अनिशा पडवळ, प्रेरणा डोंगरे आणि पायल बनसोडे यांचा समावेश आहे. तर राम डिचोलकर हा विद्यार्थी बेपत्ता आहे. दरम्यान, शोधकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

हे पाच जण समुद्रात अंघोळीसाठी गेले असताना ते बुडाल्याची माहिती समोर येत आहे. सर्व मृतदेह देवगड ग्रामीण रूग्णालयात हलविण्यात आले आहेत. स्थानिक पोलिसांच्या मदतीने शोधकार्य सुरू आहे.

यातील 5 ते 6 जणांना पोलीस आणि स्थानिकांच्या मदतीने वाचवण्यात यश आले आहे. पाण्यातून बाहेर काढण्यात आलेल्या 5 ते 6 जणांना देवगड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बुडालेल्यांपैकी 4 जणांचा मृत्यू झाला असून एकजण अजून बेपत्ता (Nigdi) आहे. राम डीचोलकर असं या विद्यार्थ्याचं नाव आहे. पोलीस आणि बचाव पथक त्याचा शोध घेत आहेत. या सहा मुलांचे वय 18 ते 24 वर्ष वयोगटातील असल्याची माहिती देवगड तहसीलदारांकडून देण्यात आली आहे.

“सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड येथे पर्यटनासाठी गेलेल्या संकल्प सैनिक अकादमीच्या प्रशिक्षणार्थींचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना दुर्दैवी आहे. सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांकडून या घटनेची माहिती घेण्यात आली असून अन्य प्रशिक्षणार्थींना त्यांच्या घरी सुखरूप पोहचवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मृत्यू पावलेल्या प्रशिक्षणार्थींच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. समुद्र किनारी, डोंगर दऱ्यांमध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कळकळीचे आवाहन आहे.”

– **अजित पवार**, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे

# तळवडे येथील दुर्घटनेप्रकरणी कंपनी, जागा मालकासह चौघांविरोधात गुन्हा दाखल

## देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद, 10 जणांवर ससून रुग्णालयात उपचार सुरु

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळवडे रेडझोनमधील अनधिकृत ‘स्पार्कल’ मेणबत्ती (कँडल) तयार करणाऱ्या कंपनीतील स्फोटात सहा महिला कामगारांचा होरपळून मृत्यू झालेल्या दुर्घटनेप्रकरणी कंपनी, जागा मालकासह चौघांविरोधात रात्री उशिरा देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



शिवराज एंटरप्रायजेस कंपनीचे मालक शुभांगी शरद सुतार (वय ३५), शरद सुतार (वय ४०, दोघे रा.पिंपरी सांडस, अशातपुरा फाटा, हवेली, पुणे) जागा मालक जन्नत नजीर शिकलगार, नजीर अमिर शिकलगार (दोघे रा.मोहननगर, चिंचवड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महापालिकेचे उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब विश्वनाथ वैद्य (वय ३८) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या दुर्घटनेत संगीता देवेंद्र आबदार (वय २८, रा.चिखली), पुनम अभय मिश्रा (वय ३६, रा.रुपीनगर, तळवडे), लता भारत दंगेकर (वय ४०, रा.रूपीनगर), मंगल बाबासाहेब खरबडे (वय ४५, रा.सहदेवनगर, तळवडे), कमलादेवी सुरज प्रजापती (वय ६१, परंडवाल चौक, देहूगाव ) आणि राधा सयाजी गोधडे (वय १८, तळवडे) या सहा महिलांचा जागीच होरपळून मृत्यू झाला आहे. तर, कंपनी मालक शरद सुतार (वय ४०) याच्यासह उषा सीताराम पाडवी (वय ४०), कविता गणेश राठोड (वय ३५), रेणुका मारूती राठोड (वय २०), कमल गणेश चौरे (वय ३५), प्रियंका अमोल यादव (वय ३२), अपेक्षा अमोल तोरणे (वय १८), शिल्पा राठोड (वय ३१), सुमन गोंधडे आणि प्रतीक्षा तोरणे (वय १६) अशा १० जणांवर ससून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी शिल्पा, प्रतीक्षा, अपेक्षा आणि उषा या चार महिलांची प्रकृती चिंताजनक आहे.

### कंपनी बेकायदेशीर विनापरवाना चालू

» आरोपी शुभांगी आणि शरद सुतार यांची केकवरील ‘स्पार्कल’ मेणबत्ती बनविण्याची कंपनी आहे. आरोपी जन्नत शिकलगार, नजीर शिकलगार यांच्या जागेत ही कंपनी आहे. आरोपी सुतार यांनी स्पार्कल’ मेणबत्ती बनविण्यासाठी बेकायदेशीर व विनापरवाना स्फोटक व ज्वालागृही पदार्थांचा वापर केला. कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत. आग विझविण्यासाठी कोणतीही उपाययोजना केली नाही. त्यामुळे कामगारांच्या जीवितास धोका होऊन त्यांचा मृत्यु होऊ शकतो, याची जाणीव असतानाही शिवराज एंटरप्रायजेस कंपनी बेकायदेशीर विनापरवाना चालू ठेऊन सहा कामगारांच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.




# मोईत्रांवरची ‘हकालपट्टी’ची कारवाई तकलादू

**पहिला आरोप म्हणजे महुआ मोईत्रा यांनी संसदेच्या ‘ई-पोर्टल’वर त्यांना खासदार म्हणून मिळालेल्या खात्याचा लॉगइन तपशील (वापरकर्त्याचे नाव आणि मुख्य म्हणजे ‘पासवर्ड’ किंवा परवलीचा संकेतशब्द) गोपनीय न ठेवता दुसऱ्यांना दिला. हा एक जोरदार चर्चेचा मुद्दा आहे, कुणाही संसद सदस्याच्या सचोटीवर संशय घेण्यास हा आरोप पुरेसा आहे असेच प्रथमदर्शनी अनेकांना वाटू शकेल.**



या आरोपाच्या प्रतिवादाचे तर्क कोणीही नाकारू शकत नाही. मुळात जर ‘खासदारांनी लॉगइन तपशील गोपनीयच ठेवावा आणि कोणालाही माहीत होऊच देऊ नये,’ असा प्रतिबंध करणारे स्पष्ट नियम आणि कायदे असते तर हा मुद्दा ग्राह्य धरता आलाही असता. पण तशी कोणतीही नियमावली आपल्याकडे नाही. त्यामुळे या अशा आरोपावरून एखाद्याच खासदारावर राळ उडवणे हे आरोप करणाऱ्यांच्याच निवडक नैतिकतेचे लक्षण ठरते. आजघडीला बरेच खासदार, आपापले लॉगइन तपशील इतरांनाही सांगतात कारण असे करणे संसदीय जबाबदाऱ्यांच्या व्यावहारिक अंमलबजावणीसाठी सोपे पडते. संसदेच्या ई-पोर्टलवर प्रश्नांचा नेमका मसुदा तयार करण्यासाठी आणि अपलोड करण्यासाठी नियमितपणे व्यावसायिक मदतनिसांकडून काम करवून घेणारे खासदार अनेक आहेत, कारण काहीजणांना लॉगइन तपशील दिले की काम लवकर होते. त्यामुळे फार फार तर, महुआ मोइत्रा यांनी अविवेकी कृती केली म्हणून त्यांच्यावर निंदाव्यंजक कारवाई होऊ शकते. परंतु मग किती खासदार आपापले लॉगइन तपशील खरोखरच गोपनीय ठेवण्याची ‘विवेकी कृती’ करत असतात, हेही पाहावे लागेलच! त्याहीपेक्षा गंभीर मानला जाणारा आरोप असा आहे की, महुआ मोईत्रा यांनी दर्शन हिरानंदानी या कुणा व्यावसायिकाच्या सांगण्यावरून ‘मोठ्या प्रमाणात पैसे आणि भेटवस्तू घेऊन’ एका व्यावसायिक समूहाला लक्ष्य केले! या दाव्यातून सूचित होते ते असे की, विद्यमान सत्ताधाऱ्यांशी कथितपणे जवळीक असलेल्या व्यावसायिक समूहाच्या विरुद्ध प्रश्न उपस्थित केले गेले, तेही त्या उद्योगसमूहाच्या प्रतिस्पर्धी उद्योजकाकडून पैसे वा भेटवस्तू घेऊन. अशा आरोपांची वैधता ठरवण्यासाठी मुळात ‘पैसे घेतले’ किंवा ‘महागड्या/ संशयास्पद भेटवस्तू घेतल्या’ हे तरी सिद्ध व्हावे लागेल की नाही? पण नाही. सुरुवातीला मोईत्रा यांच्यावर अत्यंत गंभीर आर्थिक आरोप करण्यात आले, त्यात हिरानंदानी यांच्याकडून मोईत्रांनी दोन कोटी रुपये रोख स्वीकारल्याचाही आरोप होता. पण या मोठ्या रकमेची देवाणघेवाण झाल्याचा आरोप अद्याप सिद्ध झालेलाच नाही, हा निष्कर्ष किमान प्रसारमाध्यमांतील बातम्यांवरून तरी काढता येतो. तरीही या आरोपाचा केवळ भेटवस्तूंशी संबंधित असणारा पैलू आहेच आणि भेटवस्तू मिळाल्या हे तर मोईत्रा यांनी स्वतः उघडपणे कबूल केले आहे. तेसुद्धा अगदी प्रत्येक भेटवस्तूच्या तपशीलवार वर्णनासह. तथापि, यापैकी कोणतीही भेटवस्तू महागडी वा प्रचंड किमतीची नाही. विशेष म्हणजे, हिरानंदानी यांनी समितीला उत्स्फुर्तपणे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात रोख रकमेचा कोणताही संदर्भच नाही. यामुळे एक प्रश्न निर्माण होतो: हिरानंदानी यांची चौकशी न करता, ‘रोख आणि महागड्या भेटवस्तू’ या आरोपाचा पुरावा ठरणारा तपशीलही कुठेच मिळालेला नसताना एका मोघम प्रतिज्ञापत्राच्या आधारे समिती निर्णायक निवाड्यावर कशी काय पोहोचू शकते?

महत्त्वाचा भाग असा की, खासदारांनी प्रश्न उपस्थित करण्याची संसदीय प्रक्रिया ही अशीतशी नसते. संसद सचिवालयाने कठोर नियमांचे पालन करूनच एकेक प्रश्न काळजीपूर्वक निवडलेला असतो. या नियमांचे उल्लंघन करणारे प्रश्न सरळ टाकून दिले जातात. मग, इतक्या प्रक्रियेतून निवडला गेलेला एखादा प्रश्न ‘कुटिल हेतूने प्रेरित’ कसा काय मानता येईल? या कठोर प्रक्रियेतून संसदेत मांडले गेलेल्या प्रश्नांनाही अनेकदा अत्यंत सपक, मोघम उत्तरे मिळतात, असा अनुभव आहे. राज्यसभेत अनेकदा प्रस्तुत लेखकासह अनेक खासदारांनी विविध मंत्रालयांकडून समाधानकारक उत्तरे मिळविण्यासाठी अध्यक्षांच्या हस्तक्षेपाची मागणी वेळोवेळी करण्याची पाळी आलेली आहे. या संदर्भात, मोईत्रांवर माझा आरोप असा की त्यांनी उपलब्ध संधींचा पूर्ण उपयोगच केलेला नाही! पाहा ना : जवळपास पाच वर्षांच्या कार्यकाळात मोईत्रा यांनी अवघे ६१ प्रश्नच उपस्थित केले आहेत.

## संपादकीय »

# मावशी जगो..?

***सरत्या वर्षांचा शब्द म्हणून ‘ऑक्सफर्ड’ने निवडलेल्या ‘रिझ’ या शब्दाच्या अर्थाबद्दल पुढे मतभेदही झाले; पण भाषेच्या प्रवाहीपणाची, जिवंतपणाची खूणच यातून पटली..***

रिझ (RIZZ) हा शब्द २०२३ या वर्षांचा शब्द किंवा वर्ड ऑफ द इयर असल्याचे ‘ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस’ने जाहीर केले आहे. भाषा ही हजारो वर्षे विकसित होत गेलेली असते, शब्द निर्माण होतो ही कमालीची गोष्ट आहे ना? ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसच्या ‘ऑक्सफर्ड डिक्शनरी’सह अमेरिकन डायलेक्ट सोसायटी, केम्ब्रिज डिक्शनरी, कॉलिन्स इंग्लिश डिक्शनरी अशा वेगवेगळ्या संस्था दरवर्षी हा उद्योग करतात आणि आपापल्या पातळीवर ‘वर्ड ऑफ द इयर’ अर्थात त्यांच्या मते त्या वर्षांमधला सर्वोत्तम शब्द कोणता ते जाहीर करतात. शब्द निवडण्याचे त्यांचे प्रत्येकाचे निकष, भौगोलिक परिसर, प्रक्रिया हे सगळे वेगवेगळे असते. त्यामुळे निवडलेले शब्दही निरनिराळे. उदाहरणार्थ, २०२० या कोविडला वाहिलेल्या वर्षांत अमेरिकन डायलेक्ट सोसायटीचा वर्ड ऑफ द इयर ‘कोविड’ होता.

**भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. ती ठेचली पाहिजे. असे सर्वच राजकीय पक्ष म्हणत असतात. ही घासून गुळगुळीत झालेली टेप ऐकून लोकांना वैताग आला आहे. भ्रष्टाचार करणारेच प्रिय आहेत असा संदेश यापूर्वी वेळोवेळी देशात पोहोचत राहिला आहे. त्यामुळे प्रामाणिक लोकांनी कोणाकडे पाहायचे हा प्रश्न आहे ?**

# अमृतकाळातही भ्रष्टाचारी मोकाट कसे ?

महागाईच्या दिवसांत कुटुंबातील मंडळींचे पोषण करण्यासाठी सामान्य माणूस अथक मेहनत करत आहे. मुलांचे शिक्षण, वैयक्तिक अथवा कुटुंबातील सदस्यांचे आजारपण. यांवर होणारा खर्च कमी होण्याऐवजी वाढत असतो. या सर्व उलाढालीत अवतीभवती काय चालू आहे ? याकडे लक्ष देण्यास लोकांना वेळ नाही. जीव जगवण्यासाठी राबत राहणे हेच जीवनाचे ध्येय झाले आहे. त्याप्रमाणे वागणे चालू आहे, असे वाटते. मात्र भ्रष्टाचार करणाऱ्या भ्रष्ट लोकांची तर चंगळच असते असे म्हणावे लागेल. आधी साधी सेकंडहँड सायकल घेण्याची पात्रता नसणारा माणूस लोकप्रतिनिधी झाल्यावर लाखो – करोडो रुपयांच्या गाड्यांतून फिरू लागतो. अशी कोणती मेहनत त्याने केलेली असते? हे काही कळत नाही. पाच वर्षांत ज्या वेगाने आर्थिक घोडदौड होते ती तर डोळे विस्फारणारी असते. यांना जे मासिक वेतन मिळते त्यात तर मोठी आर्थिक झेप घेणे अशक्य आहे. मग ही झेप की झडप कशावर टाकली जाते? की




जिथे यांना खजिनाच मिळतो आणि ते मालामाल होतात? झटपट मालामाल होण्याचा हा फॉर्म्युला गुपितच ठेवला जातो. जनाची नाही मनाची नाही तर कसलीच लाज न बाळगता भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने समाजात फिरू तरी कसे शकतात ? सामान्य माणसाने बँकेतून रीतसर कर्ज घेतलेले असले तरी ते फेडून पूर्ण होइपर्यंत त्याला चैन पडत नाही. आपण कोणाचे तरी देणे लागतो ही जाणीव त्याला कायम बेचैन करत असते. भ्रष्टाचारी माणसाला केवळ लुबाडणेच ठाऊक असल्याने देण्याचा आणि त्याचा विचार करण्याचा प्रश्नच नसतो. मेहनत न घेता सर्व मलाच मिळावे आणि विलासी जीवन जगावे हेच त्याला पक्के ज्ञात असते.

अर्थात दुसरीकडे हेही दिसते की, विकासाची नवनवीन स्वप्ने दाखवून विनाविलंब ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी काय करता येईल, याचा अभ्यास करून चोख नियोजन केले जाते आणि पुढे मग थाटामाटात याचे उद्घाटन सोहळे पार पडतात. असे करत विकासाच्या दिशेने वाटचाल ठेवली जाते आणि त्याला कुठे अटकाव होणार नाही याची काळजी घेतली जाते. असे आहे तर मग भ्रष्टाचार निर्मुलन गांभीर्याने का घेतले जात नाही ? अवकाशझेप घेणारा, सूर्य – चंद्र यांच्या दिशेने झेपावणारा भारत भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार करणारे यांच्यावर कारवाई करण्यात पुष्कळ मागे आहे, असे चित्र आहे, ते का? भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांचा भक्कम राजकीय आधार होणे जोपर्यंत पूर्णतः थांबत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने फिरतच राहाणार. तुमच्यामुळे कोणाचेही अडत नाही आणि अडणार नाही. उलट तुम्हीच कधीही तुमच्यावर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांखाली कधीही अडकू शकता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कांदा निर्यातबंदी विरोधात पवार रस्त्यावर

## सोमवारी मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र सरकारने अकस्मात लागू केलेल्या कांदा निर्यात बंदीचे स्थानिक पातळीवर तीव्र पडसाद उमटत असताना या विरोधात माजी केंद्रीय कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार हे रस्त्यावर उतरणार आहेत. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटातर्फे सोमवारी मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर चांदवड येथे रास्ता रोको करण्यात येणार आहे.**



या आंदोलनात पवार हे सहभागी होत असून अशाप्रकारे आंदोलनात उतरण्याची त्यांची पहिलीच वेळ असल्याचा दावा पदाधिकारी करत आहेत. निर्यात बंदीच्या मुद्यावरून स्थानिक पातळीवर उमटलेले तीव्र पडसाद व विरोधकांनी सुरू केलेली आंदोलने या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकार या निर्णयाचा फेरविचार करेल असे संकेत केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिले आहेत. निर्यात बंदीच्या निर्णयानंतर व्यापारी संघटनेने लिलाव बेमुदत बंद केले आहेत. अकस्मात लागू झालेल्या निर्णयाने कांदा दरात मोठी घसरण झाली. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बाजार समितीत आणलेला माल विक्री न करता परत नेला. आधी ४० टक्के निर्यात शुल्क नंतर ८०० डॉलर किमान निर्यात मूल्य वाढवल्यामुळे मागील चार महिन्यात कांदा उत्पादकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. आता संपूर्ण निर्यात बंदीमुळे आणखी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांची व्यथा आम्ही मांडल्यानंतर शरद पवार यांनी आंदोलनात स्वत: सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांनी सांगितले. रास्ता रोकोसाठी राष्ट्रवादीने शुक्रवारी जिथे शेतकऱ्यांवर सौम्य लाठीमार झाला होता, त्याच ठिकाणाची निवड केली आहे. केंद्र सरकारच्या कांदा आयात-निर्यात धोरणाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित दाद मागण्याचा निर्णय कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या बैठकीत घेण्यात आला. तसा ठराव सिन्नर तालुक्यातील देशवंडी येथे झालेल्या कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या बैठकीत करण्यात आला. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक दिल्लीत जाऊन पंतप्रधान, गृहमंत्री व केंद्रीय वाणिज्यमंत्री यांची भेट घेऊन कांदा निर्यात बंदी तत्काळ हटवण्याची मागणी करणार आहेत. तसेच महाराष्ट्रातील कोणत्याही बाजार समितीत प्रतिक्विंटल तीन हजार रुपये पेक्षा कमी दराने लिलावात बोली लागल्यास उत्पादक हे कांद्याचा झालेला लिलाव रद्द करतील आणि कोणीही शेतकरी व्यापाऱ्यांना तीन हजार पेक्षा कमी दरात कांदा देणार नाही असे तीन महत्त्वाचे ठराव बैठकीत करण्यात आल्याचे संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सांगितले.

### सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार

» निर्यात बंदीच्या निर्णयानंतर व्यापारी संघटनेने लिलाव बेमुदत बंद केले आहेत. अकस्मात लागू झालेल्या निर्णयाने कांदा दरात मोठी घसरण झाली. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी बाजार समितीत आणलेला माल विक्री न करता परत नेला. आधी ४० टक्के निर्यात शुल्क नंतर ८०० डॉलर किमान निर्यात मूल्य वाढवल्यामुळे मागील चार महिन्यात कांदा उत्पादकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. आता संपूर्ण निर्यात बंदीमुळे आणखी अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांची व्यथा आम्ही मांडल्यानंतर शरद पवार यांनी आंदोलनात स्वत: सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कोंडाजी आव्हाड यांनी सांगितले. रास्ता रोकोसाठी राष्ट्रवादीने शुक्रवारी जिथे शेतकऱ्यांवर सौम्य लाठीमार झाला होता, त्याच ठिकाणाची निवड केली आहे.

---

# गोपीचंद पडळकरांवर चप्पलफेक!

## छगन भुजबळांचा उत्तर देण्याचा इशारा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानपरिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर आज चप्पल फेकण्यात आली. इंदापूर येथे ही घटना घडली. यावरून छगन भुजबळ यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी एक्सवर पोस्ट करत मराठा आरक्षणाचाही उल्लेख केला. तसंच, जशास तसं उत्तर दिलं जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.**



### आम्ही जशास तसे उत्तर देऊ!

» आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, विरोध आहे तो झुंडशाहीला व दादागिरीला! ते पुढे म्हणाले, आज विधानपरिषद सदस्य गोपीचंदजी पडळकर यांच्यावर काही समाजकंटक लोकांनी विकृती दाखवून व लोकशाही पायदळी तुडवून हल्ला केल्याची बातमी समजली! या घटनेचा आम्ही सर्वजण तीव्र निषेध करतो! मी आजही इंदापूर येथे जाहीर सभेत सांगितल आहे की ही दादागिरी थांबली नाही तर याला आम्ही जशास तसे उत्तर देऊ!

इंदापूर येथे आज (९ डिसेंबर) ओबीसी एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी भाजपा आमदार गोपीचंद पडळकर, अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ उपस्थित होते. या मेळाव्यातून पडळकर आणि भुजबळांनी रोखठोक भाषण केलं. या दोघांनींही मनोज जरांगे पाटलांना घेरलं. तसंच, मराठा आंदोलनावरही टीका केली. दरम्यान, गोपीचंद पडळकर शेजारी सुरू असलेल्या आंदोलन स्थळाला भेट देण्याकरता गेले होते. तिथं शेजारीच मराठा समाजाकडून आरक्षण मागणीसाठीचे साखळी उपोषण सुरू होते. यावेळी मराठा समाजाकडून पडळकरांवर चप्पल फेकण्यात आली असल्याचा दावा केला जातोय. याप्रकरणी छगन भुजबळांनी एक्सवर पोस्ट केली. ते म्हणाले, आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, विरोध आहे तो झुंडशाहीला व दादागिरीला! ते पुढे म्हणाले, आज विधानपरिषद सदस्य गोपीचंदजी पडळकर यांच्यावर काही समाजकंटक लोकांनी विकृती दाखवून व लोकशाही पायदळी तुडवून हल्ला केल्याची बातमी समजली! या घटनेचा आम्ही सर्वजण तीव्र निषेध करतो! मी आजही इंदापूर येथे जाहीर सभेत सांगितल आहे की ही दादागिरी थांबली नाही तर याला आम्ही जशास तसे उत्तर देऊ! दरम्यान, गोपीचंद पडळकरांनी आज मराठा समाजाला देत असलेल्या कुणबी दाखल्यावर आक्षेप घेतला. इंदापूर येथे झालेल्या सभेत ते म्हणाले, ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांना सरसकट कुणबी दाखले देण्यात आले. परंतु, आमच्या समाजातील काही लोकांना दाखले मिळण्याकरता चार चार महिने वाट पाहावी लागते, त्यांच्याकडून पुरावे मागितले जातात. तर, दुसरीकडे छगन भुजबळांनीही जहाल भाषण केलं. मनोज जरांगे पाटलांची नक्कल करत त्यांच्या भूमिकेवर टीका केली. तसंच, जरांगे पाटलांना ग्रामपंचायतीचा सरपंच हेण्याचे आव्हानही केले. भुजबळांच्या या टीकेवर मनोज जरांगे पाटलांनीही चोख प्रत्युत्तर दिलं.

---

# मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

सागरी किनारा प्रकल्प अर्थात कोस्टल रोड हा मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्याचे काम वेगात सुरू आहे. हा प्रकल्प या वर्षाअखेरीस नोव्हेंबरमध्ये पूर्ण करण्याचे लक्ष्य राज्य सरकारने पालिका प्रशासनापुढे ठेवले होते. हे लक्ष्य गाठता आलं नाही. आता या कोस्टल रोडला पहिला टप्पा जानेवारी २०२४ मध्ये पूर्ण होणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. ते 'द सी.एस.आर. जर्नल एक्सीलेन्स अवॉर्ड २०२३' सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमात सुधीर मुनगंटीवार आणि खासदार श्रीकांत शिंदे यांना पुरस्काराने गौरवण्यात आलं. तर, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते.

सुधीर मुनगंटीवार यांना दि सीएसआर जर्नल चॅम्पिअन ऑफ गुड गव्हर्नन्स हा पुरस्कार देण्यात आला. तर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना सी.एस.आर जर्नल पुरस्काराने गौरवण्यात आले. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याहस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अभिनेत्री भूमी पेडणेकर, खेळाडू मिताली राज, पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि स्मिता कोल्हे यांनाही गौरवण्यात आलं. आमचं सरकार सत्तेवर आल्यानंतर आम्ही सर्व प्रकल्पांना गती दिली. सर्व प्रकल्प सुरू केले. मी एका प्रकल्पाबाबत सांगेन. मुंबईतल कोस्टल हायवे जानेवारीच्या शेवटी मरिन लाईन्स ते वरळी हा पहिला टप्पा खुला होणार आहे. पुढच्या वर्षी त्याच्यापुढील टप्पा सुरू होईल. एमटीएचएल शिवडी-न्हावा शेवा हा लांब सागरी सेतू महिन्याभरात सुरू होणार असून अडीच तासांचा कालावधी अवघ्या १५ मिनिटांवर येणार आहे", अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. पहिल्या मंत्रिमंडळापासून आतापर्यंत आम्ही सर्व निर्णय सामान्य जनतेसाठी केले. आमचं हे सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांचं सरकार आहे.

# काँग्रेस पक्षाचा धीरज साहू यांच्या व्यवसायाशी काहीही संबंध नाही!

## » काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी दिलं स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेसचे (CONGRESS) खासदार धीरज साहू (DHIRAJ SAHU) यांच्या व्यवसायांशी काँग्रेस पक्षाचा कोणत्याही प्रकारचा संबंध नसल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश (JAIRAM RAMESH) यांनी स्पष्ट केलं आहे. काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी ट्वीट करत हे स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच त्यांच्याकडे एवढे पैसे कसे सापडले हे फक्त तेच सांगू शकतील अशी प्रतिक्रिया जयराम रमेश यांनी दिली. आयकर अधिकाऱ्यांकडून एवढी मोठी रोकड त्यांच्याकडून एवढी रक्कम कशी जप्त केली जातेय याचं सष्टीकरण देखील त्यांनी द्यायला हवं,असं देखील जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.**

सध्या धीरज साहू यांच्या घरी सापडलेल्या रकमेच्या वसुलीचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या कथित व्हिडिओमध्ये नोटांचे बंडल कपाटात ठेवलेले दिसत आहे. कपाट नोटांच्या बंडलांनी भरले आहेत. खाली ठेवलेल्या पिशव्याही नोटांनी भरलेल्या दिसतात. धीरज साहू, लोहरदगा, झारखंडचे रहिवासी असलेले व्यापारी यांनी 2018 च्या राज्यसभा निवडणुकीच्या शपथपत्रात एकूण 34.83 कोटी रुपयांची संपत्ती जाहीर केली होती. त्याने 2.04 कोटी रुपयांची जंगम मालमत्ता घोषित केली आणि रेंज रोव्हर, फॉर्च्युनर, बीएमडब्ल्यू आणि पजेरो यासह लक्झरी कार सूचीबद्ध केल्या. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या प्रकरणावर भाष्य केलं होतं. त्यानंतर आयकर छापेमारी प्रकरणात काँग्रेस पक्ष थेट भाजपच्या निशाण्यावर आला



होता. पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, देशवासीयांनी या नोटांच्या ढिगाऱ्याकडे बघावे आणि मग त्यांच्या नेत्यांची प्रामाणिक भाषणे ऐकावीत..., जनतेकडून लुटलेला एक-एक पैसा परत करावा लागेल, हे आहे. मोदींची हमी' काँग्रेसचे राज्यसभेतले खासदार धीरज साहू यांच्या घर आणि कंपनीच्या कार्यालयावर प्राप्तीकर विभागाने धाडी टाकून मोठ्या प्रमाणात बेहिशेबी संपत्ती जप्त केली आहे. साहू यांच्याशी संबंधित झारखंड, ओडिशामधील ठिकाणांवर धाडी टाकून प्राप्तीकर विभागाने ही मालमत्ता जप्त केली आहे. त्यांच्या कार्यालयातील कपाटात ठासून भरलेले नोटांचे बंडल पाहून प्राप्तीकर विभागाचे अधिकारीदेखील चक्रावून गेले असतील. धीरज साहू यांनी ५००, २०० आणि १०० रुपयांच्या नोटांचे असंख्य बंडल कपाटांमध्ये ठासून भरले होते. या छापेमारीत आतापर्यंत ३०० कोटी रुपयांहून अधिक रोकड प्राप्तीकर विभागाच्या हाती लागली आहे. प्राप्तीकर विभागातील अधिकाऱ्यांच्या हवाल्याने आज तकने वृत्त प्रसिद्ध केलं आहे की, ३०० कोटींहून अधिक रक्कम मोजता मोजता पैसे मोजणाऱ्या मशीनही खराब झाल्या. त्यानंतर हैदराबाद आणि भुवनेश्वर येथून पैसे मोजणारी मोठी मशीन मागवण्यात आली. बुधवारी (६ डिसेंबर) १५० कोटी रुपये मोजल्यानंतर पैसे मोजणाऱ्या मशीन बंद पडल्या होत्या. त्यामुळे प्राप्तीकर विभागाचं काम थांबलं होतं. जे गुरुवारी पूर्ण केलं. पैसे मोजण्यासाठी प्राप्तीकर विभागाने तीन डझन छोट्या मशीनही मगवल्या होत्या. तसेच २० हून अधिक कर्मचारी केवळ पैसे मोजण्याचं काम करत होते. दरम्यान, धीरज साहू यांच्याकडे सापडलेल्या या संपत्तीवरून भारतीय जनता पार्टी थेट काँग्रेसला लक्ष्य करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या कारवाईची माहिती समाजमाध्यमांवर जाहीर करत काँग्रेसवर टीका केली.

### संपत्तीबाबत साहूच सांगू शकता

» धीरज साहू यांच्याकडे सापडलेल्या या संपत्तीबाबत काँग्रेसकडून कोणत्याही नेत्याने भाष्य केलं नव्हतं. अशातच काँग्रेसचे सचिव आणि खासदार जयराम रमेश यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. जयराम रमेश यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटलं आहे की, खासदार धीरज साहू यांच्या व्यवसायाशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा काहीही संबंध नाही. या संपत्तीबाबत फक्त साहूच सांगू शकतात. तसेच प्राप्तीकर विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या घर-कार्यालयात सापडलेल्या रोख रकमेबाबत साहू यांनीच सर्व काही स्पष्ट केलं पाहिजे.

# आठवड्यातून फक्त 5 दिवस बँका!

## » कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासामध्ये वाढ होणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लवकरच देशातील सर्व बँकामध्ये (BANK) आठवड्यातून फक्त 5 दिवस कामकाज होण्याची शक्यता आहे. आता दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बँकांना सुट्टी असते. पण आता आठवड्यातून दोन दिवस बँका बंद राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत बँका जर आठवड्याला 5 दिवस उघडल्या तर त्याचा तुमच्यावर नेमका काय परिणाम होईल? यासंदर्भाती माहिती आपण पाहुयात.**

कॉर्पोरेट जगतातील बहुतांश कार्यालयांपासून ते



सरकारी खात्यांपर्यंत आणि शेअर मार्केटमध्येही केवळ आठवड्यातून पाच दिवस काम केले जाते. अशा स्थितीत बँकांमध्ये 6 दिवस कामकाज कशासाठी? असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळं लवकरच देशातील बँका आठवड्यातून फक्त 5 दिवस उघडतील अशी शक्यता आहे. असे झाले तर त्याचा तुमच्यावर काय परिणाम होईल? 'इंडियन बँक्स असोसिएशन' (IBA), भारतात कार्यरत असलेल्या सर्व व्यावसायिक बँकांच्या संघटनेने अर्थ मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला आहे की बँकांसाठीही कामकाजाचे पाच दिवस द्यावेत. आता यावर अंतिम निर्णय अर्थ मंत्रालयाला घ्यायचा आहे. दरम्यान, अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांनी संसदेत IBA कडून असा प्रस्ताव मिळाल्याबद्दल सांगितले आहे. सध्या देशातील सर्व बँकांमध्ये महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात पाच दिवसांचा कार्य सप्ताह म्हणून काम केले जाते. सध्या दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बँकांना सुट्टी असते. बँका दर रविवारी आगाऊ बंद राहतात. आयबीए आणि बँक युनियनकडून यासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त होणार असल्याचे सरकारने म्हटले आहे, मात्र याबाबत सरकारची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. बँकांमध्ये कामाचे दिवस हे सूत्र स्वीकारले, तर आठवड्याच्या उरलेल्या दिवसांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासांमध्ये नक्कीच वाढ होईल. यामुळं सामान्य लोकांना अतिरिक्त बँकिंग तासांमध्ये त्यांचे काम पूर्ण करण्याची सुविधा मिळू शकते.

# राजस्थानचा सीएम मराठी माणूस ठरवणार!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

काँग्रेसच्या हायकमांड राजकारणावर भाजपकडून सातत्याने टीका करण्यात येते. मात्र, आता तोच कित्ता भाजपने गिरवत हायकमांड राजकारण जोरात सुरु केलं आहे. राजस्थान भाजप प्रदेशाध्यक्ष सीपी जोशी म्हणाले की, लवकरच माहिती दिली जाईल. त्यांनी अद्याप कोणतीही तारीख दिलेली नाही.

मुख्यमंत्रीपदासाठी निरीक्षक नेमले असून लवकरच माहिती दिली जाईल, असे त्यांनी सांगितले. भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीबाबत अजूनही सस्पेन्स कायम आहे. कारण, अनेक ज्येष्ठ नेते जयपूरच्या बाहेर आहेत. गजेंद्र सिंह शेखावत आणि वसुंधराराजे शिंदे जयपूरमध्ये नसल्याने चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. अशोक गेहलोत यांच्यावर हल्लाबोल करताना सीपी जोशी म्हणाले की, विरोधी पक्षनेते ठरवू शकत नाही. त्यांनी आपला विरोधी पक्षनेता ठरवावा आणि स्वतःची काळजी घ्यावी. भाजपकडून मुख्यमंत्रीपदाचा तिढा सोडवण्यासाठी राजस्थानसाठी भाजपने राजनाथ सिंह, विनोद तावडे आणि सरोज पांडे यांना निरीक्षक म्हणून पाठवलं आहे.

मध्य प्रदेशात हरियाणाचे सीएम मनोहर लाल खट्टर, के. लक्ष्मण व आशा लाखेड यांना निरीक्षक म्हणून पाठविण्यात आलं आहे. अर्जुन मुंडा आणि सर्बानंद सोनोवाल यांना छत्तीसगडला निरीक्षक म्हणून पाठवले जात आहे.

# समर्थने ऐश्वर्याला चुकीच्या जागी स्पर्श केला?

'बिग बॉस 17' (BIGG BOSS 17) हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय वादग्रस्त कार्यक्रम आहे. प्रत्येक दिवशी 'बिग बॉस'च्या घरात नवीन काहीतरी घडत असतं. 'बिग बॉस 17'च्या ट्रॉफीवर नाव कोरण्यासाठी स्पर्धक कोणत्याही थराला जात आहेत. नुकताच पार पडलेला 'वीकेंड चा वार' चांगलाच चर्चेत आला. या कार्यक्रमात सलमानसह (SALMAN KHAN) करण जोहरदेखील (KARAN JOHAR) स्पर्धकांची शाळा घेताना दिसून आला. सलमानने शाळा घेतल्यानंतर स्पर्धकांना अश्रू अनावर झाले. तर दुसरीकडे रिंकू धवनचं (RINKU DHAWAN) एक वेगळचं रुप पाहायला मिळालं. 'बिग बॉस'च्या घरात इम्यूनिटी टास्टदरम्यान चांगलाच हंगामा पाहायला मिळाला. महिला स्पर्धकांपासून लांब राहण्याच्या खानजादीच्या सल्ल्यानंतर घरातील सर्व स्पर्धक त्याच्यावर भडकले. त्यानंतर खानजादीने यामागचं कारण सांगितलं आणि रिंकू धवनचा राग अनावर झाला. खानजादी रिंकूला म्हणाला,"ऐश्वर्या सर्वांचं लक्ष वेधून घेण्यासाठी टास्कमध्ये म्हणाली आहे की, चिंटूने (समर्थ) चुकीच्या जागी स्पर्श केला". खानजादीच्या बोलण्यानंतर रिंकू धवनचा राग अनावर झाला आहे. रिंकू धवन खानजादीवर भडकलेली पाहायला मिळाली. खानजादीला ती म्हणाली,"तुला मी बर्बाद करेल. तू जीव द्यायला हवा. एक चांगली बाई तू नव्हे. खानजादीला लाज वाटायला हवी". रिंकूला एवढं भडकलेलं पाहून विकी जैनने (VICKY JAIN) तिला शांत केलं. 'बिग बॉस 17' या कार्यक्रमात लोकप्रिय K-POP सिंगरची एन्ट्री झाली आहे. कोरियन गायक औरा आता 'बिग बॉस 17' गाजवण्यास सज्ज आहे. आजच्या भागात औराची बिग बॉसच्या घरात एन्ट्री होताना पाहायला मिळेल. बिग बॉसच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या के-पॉप गायकाची एन्ट्री होणार आहे. 'बिग बॉस'मध्ये यंदा 17 स्पर्धक सहभागी झाले आहेत. 'दिल, दिमाग और दम' अशी यंदाची थीम आहे. या थीमवर आधारित मोहल्ला 1, मोहल्ला 2 आणि मोहल्ला 3 या भागात स्पर्धक राहत आहेत. 'बिग बॉस 17'च्या आगामी भागात काय घडणार याची चाहत्यांना उत्सुकता आहे.

# 'ब्रह्मास्त्र 2'मध्ये 'देव'च्या भूमिकेत दिसणार रणवीर



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंह (RANVEER SINGH) आणि आलिया भट्ट (ALIA BHATT) यांचा 'ब्रह्मास्त्र' (BRAHMASTRA) हा सिनेमा 2022 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला असून आता या सिनेमाच्या दुसऱ्या भागाची चर्चा सुरू झाली आहे. 'ब्रह्मास्त्र 2' या सिनेमात रणवीर सिंह 'देव'च्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा आहे. 'ब्रह्मास्त्र' या सिनेमाचं सर्वत्र कौतुक झालं होतं. 2022 मध्ये हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमातील रणबीरचं काम प्रेक्षकांना आवडलं. या सिनेमाच्या यशानंतर निर्मात्यांनी 'ब्रह्मास्त्र 2'ची घोषणा केली. या सिनेमासोबत रणवीर सिंह (RANVEER SINGH) आणि दीपिका पादुकोणचं (DEEPIKA PADUKONE) नाव जोडलं गेलं आहे. 'ब्रह्मास्त्र 2' या सिनेमात दीपिका पादुकोण रणवीर सिंहच्या भूमिकेत दिसणार आहे. अयान मुखर्जी दिग्दर्शित 'ब्रह्मास्त्र' या सिनेमाच्या दुसऱ्या भागाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. रणवीर सिंहच्या भूमिकेवरुन सध्या खूप चर्चा होत आहेत. न्यूज 18 च्या रिपोर्टनुसार, रणवीर सिंहने 'ब्रह्मास्त्र 2' या सिनेमासाठी होकार दिला आहे. या सिनेमात रणवीर 'देव'च्या भूमिकेत दिसणार आहे. 2025 मध्ये या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात होणार आहे. रणवीर सिंह सध्या त्याच्या आगामी 'डॉन 3' या सिनेमाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. रणवीरने अद्याप 'ब्रह्मास्त्र' या सिनेमासंदर्भात अधिकृत घोषणा केलेली नाही. आलिया भट्ट आणि रणबीरच्या 'ब्रह्मास्त्र 2' या सिनेमासाठी रणवीर सिंहआधी 'केजीएफ' फेम यशला विचारणा झाली होती. तसेच हृतिक रोशनलादेखील या सिनेमासाठी विचारणा झाली होती. 'ब्रह्मास्त्र 2'नंतर 'ब्रह्मास्त्र 3' हा सिनेमाही प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'ब्रह्मास्त्र 2'मध्ये रणवीरला पाहायला चाहते उत्सुक आहेत. 'ब्रह्मास्त्र' या सिनेमात रणबीर कपूर, आलिया भट्ट मुख्य भूमिकेत होते. तर अमिताभ बच्चन, नागार्जुन आणि मौनी रॉय हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत झळकले होते. तसेच बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानची (SHAH RUKH KHAN) झलकही प्रेक्षकांना या सिनेमात पाहायला मिळाली. आता रणवीरचं नावदेखील या सिनेमासोबत जोडलं गेलं आहे. तो शिवाचे वडील देव यांच्या भूमिकेत दिसू शकतो.

# हिना खानची आता परदेशातही हवा!

टिव्ही विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री हिना खान ही नेहमी चर्चेत असते. कधी व्यावसायिक कारणामुळे तर कधी वैयक्तिक कारणामुळे. ये रिश्ता क्या कहलाता या मालिकेतून हिनाला खरी प्रसिद्धी मिळाली. यानंतर ती बिग बॉसमध्येही दिसली. बिग बॉसमुळे तिला लोकप्रियता मिळाली. टीव्हीपासून सुरुवात करत हिनाने बॉलिवूड अन् आता हॉलिवूडपर्यंत मजल मारली आहे. आता हिना तिच्या अभिनयाची जादू परदेशात दाखवण्यासाठी सज्ज झाली आहे. हिना खानचा चित्रपट द कंट्री ऑफ ब्लाइंडला ऑस्कर 2024 साठी नामांकन मिळाले आहे. द कंट्री ऑफ ब्लाइंड हा चित्रपट एचजी वेल्सच्या कादंबरीवर आधारित आहे. या चित्रपटाला IMDB ने या 8.5 रेटिंग दिले होते. ना खानच्या या चित्रपटाला मिळालेल्या प्रतिसादानंतर तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दियाचे आडनाव मिर्झा कसे?



अभिनेत्री दिया मिर्झा हे नाव आता जारी चर्चेत नसलं किंवा चित्रपटातून झळकत नसलं तरी एक काळ असा होता की तेव्हा दियाची फक्त जादूच नव्हती तर दियासाठी लोक अक्षरशः वेडे होते. अशा दियाचा आज 42 वा वाढदिवस.. त्यानिमित्ताने जाणून घेऊया तिच्या खासगी आयुष्याविषयी काही खास बात.. दिया आज ४१ वर्षांची झाली तरी तिचे सौन्दर्य आजही तसेच आहे. किंबहुना आजही तिचे लाखों चाहते रोज तिला फॉलो करत असतात. पण दिया मुसलमान नसूनही तिचे नाव मिर्झा कसे? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. पण त्यामागे एक मोठे कारण आहे. दियाचा जन्म 9 डिसेंबर 1981 रोजी हैदराबादमध्ये झाला. दियाच्या आई दीपा या बंगाली हिंदू आहेत. तर तिचे वडील फ्रँक हेड्रिच ही जर्मन वंशांचे आहेत. ती चार वर्षांची असताना तिच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दियाला घेऊन तिची आई विभक्त झाली. पुढे दियाच्या आईने हैदराबादचे अहमद मिर्झा यांच्यासोबत लग्न केले. पण अहमद मिर्झा यांनी केवळ दियाच्या आईला स्वीकारले नाही, तर दियाला मुलगी म्हणून दत्तक घेतले. म्हणूनच दियाचे आडनाव मिर्झा असे आहे. त्यामुळे दियाचे सर्व शिक्षण हैदराबादमध्ये झाले आहे. कॉलेजमध्ये असतानाच तिने स्वतःच्या पायावर उभं राहायला सुरुवात केली. सुरुवातीला ती एका मीडिया फर्ममध्ये मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह होती. यादरम्यान तिनं लिप्टन, वॉल्स आईस्क्रीम, इमामी आणि इतर कंपन्यांसह सर्व मोठ्या कंपन्यांकडून मॉडेलिंगची ऑफर मिळू लागली. दिया मिर्झाने 2000 साली फेमिना मिस इंडिया या सौंदर्य स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत ती सेकंड रनर अप ठरली. 2000 मध्ये वयाच्या 19 व्या वर्षी दियाने मिस आशिया पॅसिफिकचा किताब पटकावला आणि तिचे नशीबच पालटले.

# 'कुर्रर' नाटक सोडल्याचं नम्रताने सांगितलं खरं कारण

काही दिवसांपुर्वी कुर्रर नाटकातून अभिनेत्री नम्रता संभेराव आणि अभिनेता प्रसाद खांडेकरने एक्झिट घेतली. रंगभूमीवर चांगल्या सुरु असलेल्या नाटकामधून नम्रता - प्रसादने काढता पाय घेतला. या दोघांच्या अचानक नाटक सोडण्याने अनेकांना धक्का बसला. अशातच आता नम्रता संभेरावने सोशल मीडियावर नाटक का सोडलं, याचा खुलासा केलाय. नम्रताने खरं कारण सांगत कुर्रर नाटकातील एक्झिटबद्दल भाष्य केलंय. नम्रताने सोशल मीडियावर याबद्दल लांबलचक पोस्ट लिहीली आहे. ही पोस्ट लिहून नम्रता लिहीते, "कुर्ररर ह्या नाटकातली माझी भूमिका पूजा। WILL MISS U SO MUCH माझ्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचं नाटक . माझी भूमिका मी अक्षरशः जगले . माझ्या आयुष्यातलं अभिनयाचं पहिलं सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचं बक्षीस ह्याच नाटकाने मिळवून दिलं मला. कोविड काळानंतर आम्ही



कलाकारांनी एकमेकांच्या विश्वासावर उभं केलेलं हे नाटक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं प्रेम केलं , अत्यंत व्यस्त SCHEDULE मधून आम्ही कुर्ररर ह्या नाटकाचे 2वर्षात 200हुन अधिक प्रयोग केले." नम्रता पुढे लिहिते, प्रआणखी भरघोस प्रयोग व्हावे ह्यासाठी सर्वानुमते घेतलेला हा निर्णय आहे. काळजावर दगड ठेवून घेतलेला निर्णय काय असतो पहिल्यांदा अनुभवला पण हा निर्णय चांगल्या भावनेने घेतला गेला आहे नाटकासाठी च घेतला आहे आणि तुम्ही रसिक प्रेक्षक आमच्या निर्णयाचा मोठ्या मनाने स्विकार कराल अशी खात्री आहे. ह्यापूर्वी जसं प्रेम केलंत तसंच प्रेम तुम्ही रसिक प्रेक्षक आमच्या कुर्ररर ह्या नाटकावर नवीन संचावर कराल अशी आशा आहे." नम्रता शेवटी लिहिते, "मी अजूनही आमच्या म्हणतेय कारण शारीरिक रित्या EXIT घेतली तरी त्या नाटकाशी मी मनाने जोडले गेलेय , तिथून कधीच EXIT होत नसते . माझ्या शुभेच्छा कायम सोबत असतील. जिची खरंच कुठे शाखा नाही अशी विशाखा ताई विनोदाचा बाप पॅडी दादा माझी अत्यंत जवळची मैत्रीण मयुरा रानडे आणि SUPREME प्रियदर्शन दादा तुम्हाला व कुर्ररर च्या सर्व टीम ला पुढील प्रयोगांसाठी HOUSEFULL शुभेच्छा.

# महाराष्ट्राचे खेळाडू सर्वोत्तम यशासाठी सज्ज!

## पहिल्या पॅरा खेलो इंडिया स्पर्धेला 10 डिसेंबर पासून सुरुवात

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**पहिल्या पॅरा खेलो इंडिया स्पर्धेला उद्यापासून (10 डिसेंबर) सुरुवात होत आहे. शक्य आणि इच्छा असूनही काही व्यक्ती नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागल्याने या सगळ्या अनुभवापासून दूर असतात. पण, खेलो इंडियाच्या माध्यमातून क्रीडा मंत्रालयाने असा खेळाडूंना आपली गुणवत्ता दाखवून देण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे.**




या पहिल्या पॅरा खेलो इंडिया स्पर्धेचा पडदा उद्या उघडला जाणार आहे. देशभरातील पॅरा खेळाडू त्यानंतर आपली प्रतिभा दाखवण्यासाठी मैदानात उतरतील. महाराष्ट्रातील खेळाडू देखील यात मागे नसून सर्वोत्तम यशासाठी उत्सुक व या स्पर्धा सुरु होण्याची वाट बघत आहेत. महाराष्ट्राला तिरंदाजी आणि नेमबाजीमधून देखिल अनुभवी खेळाडूंच्या उपस्थितीचा फायदा मिळणार आहे. आशियाई स्पर्धेचा अनुभव असलेला आदिल महंमद नाझिर अन्सारी हा रिकर्व्ह प्रकारात महाराष्ट्राचे आशास्थान असेल. याशिवाय कम्पाऊंड प्रकारात पूनम दुसेजा आणि अभिषेक ताव रे यांच्याकडूनही महाराष्ट्राला पदकाच्या आशा आहेत. पॉवरलिफ्टिंग मध्ये देविदास झिटे (४९ किलो) आणि दिनेश बगाडे (१०७ किलो) आपले कौशल्य पणाला लावतील. पदकांची संख्या वाढवणारा आणखी एक प्रकार म्हणजे नेमबाजी या स्पर्धा प्रकारातही महाराष्ट्राला चांगल्या यशाची खात्री आहे. यामध्ये पॅरा ऑलिम्पिकच्या वाटेवर असलेला स्वरुप उन्हाळकर याच्याकडून सर्वाधिक अपेक्षा बाळगल्या जात आहेत. राघव बारावकर, रेखा पडवळ आणि शंतनु हे देखिल आपला अनुभव पणाला लावणार आहेत. स्टार आंतरराष्ट्रीय पॅरा बॅडमिंटनपटू सुकांत कदम, निलेश गायकवाड, आरती पाटिल आणि लता हे बॅडमिंटनमधील महाराष्ट्राचे प्रमख आशास्थान असेल. उद्या रविवारपासून पहिल्या सत्रातील खेलो इंडिया पॅरा गेम्सला बॅडमिंटन स्पर्धा प्रकराने सुरुवात होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आतापर्यंत या प्रत्येकाने आपली ओळख करुन दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे सोनेरी यश दूर नाही इतका या संघाबाबत विश्वास व्यक्त करण्यात येतो. महाराष्ट्र बॅडमिंटन संघामध्ये आंतरराष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या स्टार खेळाडूंचा समावेश आहे. सुकांत कदम, निलेश गायकवाड, आरती पाटील, कोमल आणि दिशा यांनी आपल्या दर्जेदार कामगिरीत सातत्य ठेवत आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजवल्या आहेत. सुकांत आणि निलेश गायकवाड यांच्याकडे पॅरालिंपिक स्पर्धेचाही अनुभव आहे. त्यामुळे निश्चितपणे महाराष्ट्राला एकेरी आणि दुहेरी, मिश्र दुहेरीतकिताबाची सुवर्णसंधी आहे, असा विश्वास संघाचे मुख्य प्रशिक्षक चंद्रहास कान्हेरे यांनी व्यक्त केला.

### बॅडमिंटनमध्ये सोनेरी यशाची संधी

स्टार आंतरराष्ट्रीय पॅरा बॅडमिंटनपटू सुकांत कदम, निलेश गायकवाड, आरती पाटिल आणि लता हे बॅडमिंटनमधील महाराष्ट्राचे प्रमख आशास्थान असेल. उद्या रविवारपासून पहिल्या सत्रातील खेलो इंडिया पॅरा गेम्सला बॅडमिंटन स्पर्धा प्रकराने सुरुवात होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आतापर्यंत या प्रत्येकाने आपली ओळख करुन दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे सोनेरी यश दूर नाही इतका या संघाबाबत विश्वास व्यक्त करण्यात येतो. पॉवरलिफ्टिंग मध्ये देविदास झिटे (४९ किलो) आणि दिनेश बगाडे (१०७ किलो) आपले कौशल्य पणाला लावतील. पदकांची संख्या वाढवणारा आणखी एक प्रकार म्हणजे नेमबाजी या स्पर्धा प्रकारातही महाराष्ट्राला चांगल्या यशाची खात्री आहे. यामध्ये पॅरा ऑलिम्पिकच्या वाटेवर असलेला स्वरुप उन्हाळकर याच्याकडून सर्वाधिक अपेक्षा बाळगल्या जात आहेत. राघव बारावकर, रेखा पडवळ आणि शंतनु हे देखिल आपला अनुभव पणाला लावणार आहेत

# भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरोधात करणार दोन हात

## टी-20ची कमान सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघ उद्यापासून (10 डिसेंबर) दक्षिण आफ्रिकेविरोधात मैदानात उतरणार आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर भारताला तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामने खेळायचे आहेत. टी-20ची कमान सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आली आहे, तर केएल राहुल एकदिवसीय मालिकेची कमान सांभाळणार आहे. कसोटी संघाची कमान रोहित शर्माकडे सोपवण्यात आली आहे. पाहूयात संपूर्ण वेळापत्रक आणि कोण कोणत्या संघात कोणते खेळाडू...**




टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला T-20 सामना 10 डिसेंबरला डर्बनमध्ये खेळवला जाणार आहे. यानंतर दुसरा टी-20 सामना 12 डिसेंबरला खेळवला जाईल. तिसरा T- 20 14 डिसेंबरला होणार आहे. 17 डिसेंबरपासून वनडे मालिका सुरू होणार आहे. हा सामना जोहान्सबर्ग येथे होणार आहे. यानंतर दुसरा सामना 19 डिसेंबरला तर तिसरा सामना 21 डिसेंबरला होणार आहे. कसोटी मालिकेतील पहिला सामना 26 डिसेंबरपासून तर दुसरा सामना 3 जानेवारीपासून होणार आहे. सूर्यकुमार यादव (कर्णधार), यशस्वी जायसवाल, शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड, तिलक वर्मा, रिंकू सिंह, श्रेयस अय्यर, ईशान किशन (विकेटकीपर), जितेश शर्मा (विकेटकीपर), रवींद्र जाडेजा (उपकर्णधार), वाशिंगटन सुंदर, रवि बिश्नोई, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, दीपक चाहर. ऋतुराज गायकवाड, साई सुदर्शन, तिलक वर्मा, रजत पाटीदार, रिंकू सिंह, श्रेयस अय्यर, केएल राहुल (कर्णधार आणि विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), अक्षर पटेल, वाशिंगटन सुंदर, कुलदीप यादव, युजवेंद्र चहल, मुकेश कुमार, आवेश खान, अर्शदीप सिंह, दीपक चाहर. रोहित शर्मा (ROHIT SHARMA) (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जायसवाल, विराट कोहली (VIRAT KOHALI), श्रेयस अय्यर (SHREYAS IYER) , ऋतुराज गायकवाड (RUTURAJ GAIKWAD), ईशान किशन (विकेटकीपर), केएल राहुल (विकेटकीपर), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जाडेजा, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, मोहम्मद शमी*, जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), प्रसिद्ध कृष्णा.

### गोलंदाजी कमकुवत राहू शकते

कसोटी संघाची कमान रोहित शर्माकडे सोपवण्यात आली आहे. पाहूयात संपूर्ण वेळापत्रक आणि कोण कोणत्या संघात कोणते खेळाडू... टीम इंडिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला T-20 सामना 10 डिसेंबरला डर्बनमध्ये खेळवला जाणार आहे. यानंतर दुसरा टी-20 सामना 12 डिसेंबरला खेळवला जाईल. तिसरा T- 20 14 डिसेंबरला होणार आहे. 17 डिसेंबरपासून वनडे मालिका सुरू होणार आहे. हा सामना जोहान्सबर्ग येथे होणार आहे. यानंतर दुसरा सामना 19 डिसेंबरला तर तिसरा सामना 21 डिसेंबरला होणार आहे. कसोटी मालिकेतील पहिला सामना 26 डिसेंबरपासून तर दुसरा सामना 3 जानेवारीपासून होणार आहे. भारताविरुद्धच्या टी-20 मालिकेत दक्षिण आफ्रिकेने आपला सर्वात महत्त्वाचा गोलंदाज कागिसो रबाडालाही विश्रांती दिली आहे. आता लुंगी एनगिडी बाद झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकन वेगवान गोलंदाजी आक्रमण थोडे कमकुवत दिसेल. आता या संघातील वेगवान गोलंदाजीची जबाबदारी जेराल्ड कोएत्झी, नांद्रे बर्जर, ओटनील बार्टमन आणि लिझार्ड विल्यम्स यांच्यावर असेल.